• महाराष्ट्र शासन •

**श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,सोलापूर व**
**डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर**

**Opposite District Court, Civil Chowk, Solapur- 413 003, Maharashtra State, INDIA**

**Dean :** 0217-2319448, 2749401 • **Fax :** 0217-2310766 • **e-mail:-** deansolapur@gmail.com

जा.क्र.श्रीछशिमसरुसो/आस्था/वर्ग-१व२/10813-15 /२०१८ दिनांक :- 30 / 11 /२०१८

# जाहिरात

महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजने मार्फत श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथील वैद्यकीय समन्वयक (MCO) करार पध्दतीवर (Contract basis) जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ०४/१२/२०१८ ते १०/१२/२०१८ पर्यंत दुपारी ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी) पात्र उमेदवाराकडून आवश्यक त्या कागदपत्रासह विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर विहित नमुन्यातील अर्ज उमेदवारांना वैद्यकीय अधिक्षक कार्यालय, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथून व्यक्तिशः उपलब्ध होतील. अर्ज स्विकारण्याचे ठिकाण अधिष्ठाता कार्यालय, आवक विभाग, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | पदाचे नांव | एकुण पदे संख्या | शैक्षणिक आर्हता व अनुभव | मुलाखत दिनांक | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अधिष्ठाता, श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,सोलापूर | वैद्यकीय अधिकारी (MCO) | ०१ | एम.बी.बी.एस/ बी.ए.एम.एस. (MBBS/BAMS) | दिनांक १२/१२/२०१८ रोजी दुपारी ०३.३० | मुख्यकार्यकारी अधिकारी, महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना यांनी निश्चित केल्यानुसार मानधन देण्यात येईल. |

## अटी व शर्ती

१) त्यांची नेमणूक ही महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत कंत्राटी पदावर तात्पुरती असेल व त्यांना कोणतेही नोटीस अथवा कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल व सेवा समाप्त झाल्यावर त्यांना कोणत्याही न्यायालयात नेमणूकी संबंधिने दावा करण्याचा हक्क राहणार नाही अथवा तसा शासनाकडे अर्ज करता येणार नाही

२) त्यांची नियुक्ती ०४ महिन्याचे कालावधी करीता राहील. सदर कालावधीत काम असमाधानकारक असल्याने आढळून आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

३) नियुक्त कर्मचाऱ्यांना वेतनाबाबत मुख्यकार्यकारी अधिकारी, महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना यांच्याकडून माधनाबाबत वेळोवेळी निश्चित व सुधारित माधन प्राप्त झाल्यास त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

४) महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत केस रजिस्टरपासून ते प्रीऑथ पाठविणे व क्लेम पाठविणे इ.सर्व कामे करावी लागतील व वेळोवेळी अधिष्ठाता व प्रशासकीय कार्यालयातून आदेश निर्गमित होतील ते त्यांना बंधनकारक राहतील.

५) त्यांना अन्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सार्वजनिक सुट्यांचा लाभ मिळेल.

६) त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ लागू नाही. त्या अनुसार मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भ.नि.निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाही अथवा ज्या पदावर नेमणूक केली आहे त्या पदावर कंत्राटीमध्ये नमुद केलेल्या मुदतीबाहेर कोणतेही अधिकार राहणार नाही व त्यांना सदर पदावर कायमपणाचा हक्क/दावा करता येणार नाही.

(पृष्ठ क्र. २ वर)

Scanned by CamScanner

७) नेमणूकीच्या अटी मान्य असल्यास नियुक्तीचे ठिकाणी हजर होणे पुर्वी त्यांनी महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना यांनी दिलेल्या विहित नमुन्यातील बंधपत्र रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर लिहून करार पत्रक देणे बंधनकारक राहील.

८) त्यांची सेवा कोणतेही कारण न देता मुदतीपूर्वी समाप्त करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील. तसेच जर त्यांना कंत्राटी काळात सेवामुक्त व्हायचे असेल तर १ महिन्याची पूर्वी नोटीस किंवा १ महिन्याचे वेतन भरुन त्यांना कार्यमुक्त करण्यात येईल.

९) त्यांचा उपरोक्त कंत्राटी कालावधी समाप्त होताच त्यांची कंत्राटी नेमणूक आपोआप संपुष्टात येईल.

१०) त्यांना दिलेली नेमणूक ही कंत्राटी ०४ महिन्याकरीता असेल, परंतु जर महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना बंद पडल्यास त्यांची सेवा आपोआप संपूष्टात येईल.

११) वरील पदाची कमाल वयोमर्यादा ३८ असेल व ती सुयोग्य प्रकरणी ४५ वर्षापर्यत शिथिलक्षम असेल. सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यास कमाल वयेमर्यादा ६२ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

१२) या पदासाठी प्रतिक्षायादी करण्यात येत आहे.

१३) उच्च शैक्षणिक आर्हताधारकांस व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राध्यान्य दिले जाईल.

१४) वरील पदाच्या उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान असणे व माराठी लिहिता वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

१५) अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवाराची मुलाखात घेण्यात येईल.

१६) उमेदवाराने चुकीची माहिती / कागदपत्रे दिल्यास उमेदवारी रद्दबादल करण्यात येईल. तसेच अशा उमेदवारांची नियुक्ती झाल्यास त्याची नियुक्ती समाप्त होईल.

१७) उमेदवाराने अर्ज A ४ आकाराच्या कोऱ्या कागदावर करावयाचा असून त्यांमध्ये खालील बाबी अंतर्भूत असाव्यात.

**अ) उमेदवारांची सर्वसाधारण माहिती**

१) अर्ज केलेल्या पदाचे नाव २) ठळक अक्षरात स्वतःचे नांव ३) अर्जदाराचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक/भ्रमणधोनी क्रमांक (अनिवार्य) ४) कामाचा अनुभव काम केलेली संस्था, धारण केलेली पद, कालावधी, पदाचा जबाबदारी व वेतन ५) शैक्षणिक अर्हतेची संपूर्ण तपशील अभ्यास क्रमाचे नांव, संस्था, विद्यापीठाचे नांव, उत्तीर्ण झाल्याचे वर्ष, गुणाची टक्केवारी ६) वैद्यकीय समन्वयक-एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त असलेले उमेदवार.

**ब) आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती व मूळ कागदपत्रे.**

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे २) शाळा सोडलेल्याचा दाखला / जन्मतारखेचा दाखला ३) अनुभवाची प्रमाणपत्रे ४) पासपोर्ट आकाराचे २ फोटो

१८) अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख १०/१२/२०१८ राहील व अर्ज कार्यालयीन वेळेत सायं.५.०० वाजेपर्यंत आवक विभाग अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांचे कार्यालयात स्विकारले जातील.

१९) **मुलाखतीची तारीख १२/१२/२०१८ वेळ दुपारी ०३.३० वाजता** असून उमेदवाराने अधिष्ठाता यांचे कक्षात मूळ कागदपत्रासह स्वखर्चाने हजर रहावे, त्यांसाठी वेगळी मुलाखात पत्रे पाठविली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**टीप :- १) सदर जाहिरातीमध्ये कोणताही बदल किंवा रद्द करण्याचे किंवा निवड यादी कोणत्याही वेळी रद्द करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांच्याकडे राहतील.**

**अधिष्ठाता,**
श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर

**प्रति,**

१) सुचना फलक, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर.

२) वैद्यकीय अधिक्षक, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जीवनदायी भवन राज्य कामगार विमा रुग्णालय आवार गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०१८.

Scanned by CamScanner